पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर — असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २५ वा | सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ५० हजार शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफी

## १४ लाख लोकप्रतिनिधी- शासकीय कर्मचाऱ्यांना वगळले




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत तब्बल ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफीचा लाभ मिळाला असून यातील बहुतांश शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती आणि मराठवाडा विभागातील आहेत.

दुसरीकडे लोकप्रतिनिधी, सरकारी, निमसरकारी कर्मचारी अशा १४ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

राज्य सरकारने कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सुमारे ३६ हजार कोटींची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेत ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखाच्या मर्यादेत कर्जमाफी दिली जाणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे. तसेच दोन लाखापेक्षा अधिक कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्याची दोन लाखांवरील रक्कम बँकेत भरल्यानंतर एकवेळ समझोता अंतर्गत त्यांच्याही कर्ज खात्यात सरकार दोन लाख रुपये जमा करणार आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमुक्ती योजनेत ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरनोत्तर कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. यामध्ये शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती आणि मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. मराठवाड्यातील १८ हजार ७२३, अमरावतीमधील ११ हजार९४६,नाशिक विभागातील ७ हजार ६३९, पुणे विभागातील ६ हजार ३२२, कोकणातील १५६७, नागपूर विभागातील ४ हजार ६०९ अशी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या आहे. ५० हजार शेतकऱ्यांना मरनोत्तर कर्जमाफी मिळणे याचाच अर्थ अनेक शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली असून सरकारने या शेतकऱ्यांच्या मृत्यूची कारणे जाहीर करावीत. त्यातून कर्जाला कंटाळून किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केली याचा तपशील समोर येईल अशी मागणी शेतकरी नेते अजित नवले यांनी केली.

कर्जमाफीसाठी सरकारने तयार केलेल्या पोर्टलवर १२ राष्ट्रीयकृत बँकानी १६ लाख कर्जखात्यांची, ३० जिल्हा बँकानी १० लाख, १० खाजगी बँकानी ४७ हजार, महा. ग्रामीण बँकेने ४ लाख ७० हजार अशी एकूण ३१ लाख २४ हजार कर्जदार शेतकऱ्यांची माहिती अपलोड केली आहे. राज्य सरकारने कर्जमाफीच्या निकषानुसार मंत्री, खासदार, आमदार असे २ हजार ८८ लोकप्रतिनिधी, ११ लाख ७५ हजार ७४२ शासकीय अधिकारी, कर्मचारी, विविध महामंडळातील एक लाख ७६ हजार ११२कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थामधील ७ लाख ३१ हजार कर्मचारी आणि सहकारी संस्थामधील १ लाख १२ हजार अशा १४ लाख ६६ हजार कर्जदार शेतकऱ्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. तर प्राप्तीकर भरणारे ९४ हजार शेतकरी अपात्र ठरल्याची माहिती सहकार विभागातील सूत्रांनी दिली.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त शानदार मिरवणूक

### विविध आकर्षक देखाव्याच्या माध्यमातून दिला सामाजिक संदेश




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्साह पूर्ण वातावरणात जयघोष करत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 106 व्या जयंती महोत्सवाची दिमाखदार मिरवणुकीने सांगता करण्यात आली. महापुरुषांच्या जीवन कार्यावर आधारित आकर्षक अशा प्रबोधनात्मक देखाव्याच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात आला. डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. उत्साहाला उधाण आल्याचे दिसून आले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 106 व्या जयंती महोत्सवास गुरुवार दि. 1 ऑगस्ट रोजी सार्वजनिक मंडळांच्या वतीने प्रतिमेची मनोभावे प्रतिष्ठापना करून प्रारंभ करण्यात आला होता. त्यानंतर आज रविवारी दि. 9 ऑगस्ट 2026 रोजी उत्साह पूर्ण वातावरणात शानदार मिरवणुकीने या महोत्सवाची सांगता करण्यात आली. रात्री दहा वाजता या मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव मध्यवर्ती समितीच्या वतीने या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या मिरवणुकीची सुरुवात रविवारी दुपारी दोन वाजता करण्यात आली. मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य मिरवणूक पार पडली. सुमारे 55 मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविला.यावेळी प्रमुख अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. या मिरवणुकीत विविध सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करण्यात आले होते. याप्रसंगी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी समाज बांधव, विविध सामाजिक संस्था, संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान, विविध मंडळाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वस्ताद लहुजी साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कायार्चे प्रबोधनात्मक देखावे साकारण्यात आले होते. या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर आधारित भव्य दिव्य विविध देखावे सादर करण्यात आले होते. डॉल्बीच्या चित्त थरारक व कलरफुल विद्युत रोषणाईत तरुणाईने विविध गीतावर ठेका धरला. बुधवार पेठ, मातंग वस्ती, वीर फकीरा चौक, जुना बोरामणी नाका, लष्कर, विजापूर नाका, देगाव, पांढरी वस्ती, अशोक चौक, फॉरेस्ट यासह विविध परिसरातील मंडळांनी सहभाग नोंदविला.

ही मिरवणूक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक मार्गे, रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा, मेकॅनिकी चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या मिरवणुकीची सांगता झाली.

या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष साक्षांत लोखंडे, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, ॲड. शैलेश पोटफोडे, युवराज पवार, अजय मोहिते, बंडू गवळी, वैशाली डोलारे, मनोज लोंढे, महेश लोंढे, किशोर जाधव, प्रवीण वाडे, विशाल लोंढे, सतीश बगाडे, गोविंद कांबळे, विश्वास शिंदे, सुहास शिंदे,शांतीलाल साबळे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते , समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**सहभागी मंडळाचा सत्कार**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती आणि क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना आणि इतर संघटनांच्या वतीने या मिरवणुकीत सहभागी झालेल्या मंडळाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**या मंडळांनी घेतला मिरवणुकीत सहभाग**

या मिरवणुकीत आर. के. प्रतिष्ठान : कोहिनूर मिल : लाल बावटा कलापथक - संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गिरणी कामगार हक्काचे संघर्ष वीर देखावा, वारणेचा वाघ युथ फाउंडेशन पांढरे वस्ती : जग बदल घालुनी घाव - सांगूनी गेले मज भीमराव देखावा , वीर फकीरा तरुण मंडळ : संघषार्तून स्वाभिमान - शिक्षणातून परिवर्तन देखावा, एस. एस. ग्रुप : एकजुटीच्या या रथावर आरूढ होऊनी चल बा पुढती देखावा, सी. एस. मित्रपरिवार : महापुरुषांच्या देखावा, मधला मांगवाडा तालीम सावधान तरुण मंडळ : मुंबई महाराष्ट्राचीच - संयुक्त महाराष्ट्र चळवळ देखावा, जय लहुजी युवा प्रतिष्ठान : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विविध ग्रंथ संपदा देखावा, नवरंग तरुण मंडळ देगाव : आकर्षक देखावा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ : शाळेत नेतानाचा देखावा सादर केला होता. तसेच इतर मंडळांनी लक्षवेधक देखावे सादर केले होते.

## 19 गुन्हे दाखल असूनही हा माणूस मंत्री झालाय

### सुषमा अंधारेंनी केला मंत्री गोरेंचा 'पंचनामा'



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आज (ता. ०९ ऑगस्ट) पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर हल्लाबोल केला. 'गोरे कोण आहेत, हे मला चांगलंच माहिती आहे.

त्यांच्यावर साधारणतः 19 गुन्हे दाखल आहे. विशेष म्हणजे 19 गुन्हे दाखल असतानाही हा माणूस मंत्री झाला आहे. एखाद्यावर 4 ते 5 गुन्हे दाखल झाले, तर त्याच्यावर मोक्का दाखल होतो. कदाचित दाखल झालेले गुन्हे पाहता मोक्काची कारवाई झाली असती म्हणून गोरे भाजपमध्ये दाखल झाले आहेत का? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला.

अंधारे ह्या गेल्या दोन दिवसांपासून सोलापुरात असून त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन पालकमंत्री गोरे यांच्यावर हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या, ना खाऊंगा ना खाणे दूंगा असं म्हणणाऱ्यांनी राम मंदिरातील पैशाची चोरी केली, त्यासंदर्भात राम रक्षा आंदोलन सुरु आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कारण नसताना काही विधाने केली. त्यामुळे 'बालकमंत्री' गोरे यांना त्याच भाषेत बोलण्याचा प्रयत्न संजय राऊत यांनी केला.

जयकुमार गोरे यांचा व्हिडिओ दाखवत सुषमा अंधारे म्हणाल्या, गोरे कोण आहेत, हे मला चांगलंच माहिती आहे. एका महिलेला स्वतःचे नग्न फोटो पाठवले; म्हणून त्यांच्यावर कम्प्लेंट दाखल करण्यात आली. मी जेव्हा त्यावर बोलले, तेव्हा त्यांच्यावर दबाव आणला गेला. संबंधित महिला पैसे घेताना कोठेही दिसत नाही. पण गोरेंकडे 1 कोटी रुपये कुठून आले, असे कोटार्ने म्हटलं आहे. त्याचं उत्तर त्यांनी द्यावं.

सुषमा अंधारे म्हणाल्या, मृत व्यक्तीला जिवंत दाखवत एका दलित माणसाची जागा नावावर करून घेतली, त्यांच्यावर 6 मार्च 2025 रोजी ॲट्रॉसिटी दाखल झाली आहे. तसेच, 8 मे 2026 रोजी 'नॉन बेलेबल वॉरंट' जाहीर झालाय, हे समन्स रद्द होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. या सगळ्यावर गोरे कधी बोलणार आहेत का?

मी खूप जुने बोलतच नाही. मंत्री असणाऱ्या माणसावर जे डाग आहेत, त्यावर बोला. पावाचा तुकडा खाऊन भुंकणाऱ्यांनी यावर बोलावं. भाजपच्या जुन्या माणसांना भाजप संधी देत नाही. मात्र, काँग्रेसमधून आलेल्या माणसाला मंत्री केलं, असा आरोप अंधारे यांनी केला.

दहिवडी पोलिस ठाण्यात विविध गुन्हे दाखल झाले आहेत. (सुषमा अंधारे यांनी कलम वाचून दाखवली) त्यावर गोरे यांना उत्तर द्यायची असतील, तर गोरेंसाठी मी दुसरा एपिसोड लवकरच ओपन करेन....मिरज पोलिस ठाण्यातही 420 चा गुन्हा दाखल झाला आहे. इस्लामपूरमध्येही गुन्हा दाखल आहे, काय कीर्ती आहे गोरेंची, मीठ मोहोरीने दृष्ट काढावी. मी गोरेंना ओळखते, मी त्यांची कुंडली वाचतेय, असेही अंधारे यांनी नमूद केले.

त्या म्हणाल्या, १९ गुन्हे दाखल असलेल्या माणसाला मंत्री म्हणून घ्यावं लागलं, यात फडणवीस यांची काय मजबुरी होती. दुसऱ्यांचा माल चोरताय, तो माल तरी चांगला चोरायचा ना. छत्रपती शिवाजी एज्युकेशनल इन्स्टिट्यूट आहे, त्यांना मायणीत एक कोविड सेंटर दिलं होतं. महात्मा फुले योजनेच्या वेळी गोरेंच्या पत्नीशी संबंधित असणारं बँक अकाउंटचा नंबर दिला होता.

त्याकाळात 223 बिलं उचलली, तेव्हा पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला नाही. हायकोर्टने आदेश द्यायच्या अगोदरच जुजबी गुन्हा दाखल करून घेण्यात आला. या प्रकरणात चार्जशीट दाखल करण्यात आली आहे. मात्र, गोरे यांचं नाव वगळण्यात आलं आहे. आभाळगात माया तुझी आम्हावर राहू दे, अशी पोस्ट घनश्याम सोनवणे नावाच्या पीएसआयने गुरु पौर्णिमेला केली आहे, असेही अंधारे यांनी स्पष्ट केले.

त्या म्हणाल्या, सोलापूर विश्रामगृहातील दोन सूट फक्त पालकमंत्रीसाठी आहेत. 10 कोटी खर्च करून सुशोभीत केले आहेत, त्याचा वापर कशासाठी केला जातो, हे तुम्हीच पाहा. सोलापूर विश्रामगृहाच्या दोन सूटचे दरवाजे नेहमी बंद असतात, ते का असतात, याचीही उत्तर द्यावं.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेचं उभ्या महाराष्ट्रात काय झालं, याच उत्तर मी तुम्हाला देते. या माणसाला गंभीर गुन्ह्याच्या प्रकरणात समन्स मिळणार असेल तर त्याला मंत्रिपदावर का ठेवायचं? किमान भाजपच्या निष्ठावंताना द्या; कारण शिंदेंच्या कोपऱ्याला तुम्ही गूळच लावणार आहात, असाही टोला अंधारे यांनी लगावला.

ग्रामविकास खात्याचा कारभार कसा चालतो, हे विजय चौधरी याच्या ऑडिओ क्लिपमधून बाहेर आलं आहे. चौधरी हा भाजपचाच माणूस आहे. या वेळी सुषमा अंधारे यांनी ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपमध्ये गोरे आपल्या कामाला 10 टक्के मागतायत, असं भाजपचाच माणूस सांगतोय. शिवसेनेच्या लोकांबाबत जपून बोलायचं; कारण तुम्ही एक वाक्य बोललात, तर मी अख्खी बखर बाहेर काढेन, असा इशाराही अंधारे यांनी दिला.

## सातारा, सोलापूर व पुणे जिल्ह्यातील ९५ हजारावर शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पुणे महसूल विभागातील पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील ९५ हजार ६०३ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहेत, अशी माहिती सहकार विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास शुक्रवारी (७ ऑगस्ट) सुरुवात करण्यात आली; यामध्ये कर्जमुक्तीच्या पहिल्या यादीत पुणे जिल्ह्यातील ३८ हजार ९७० पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ३४५ कोटी २५ लाख ५ हजार ५९४ रुपये जमा करण्यात आले आहेत. यात सातारा जिल्ह्यातील १९ हजार ५८ शेतकऱ्यांना १४२ कोटी ७ लाख ३९ हजार २८४ रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ३९४ शेतकऱ्यांना १२८ कोटी १० लाख ४४ हजार १६१ रुपये याप्रमाणे ६९ हजार ४२२ शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण ६१५ कोटी रुपयाहून अधिक रक्कम कर्ज खात्यावर जमा करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील १ हजार ३५१, भोर २ हजार ३०८, मुळशी ५७६, मावळ १ हजार ३५२, खेड २ हजार २०८, शिरुर ४ हजार ७२९, आंबेगाव १ हजार ३५१, इंदापूर ९ हजार २३१ , वेल्हा ४१९, जुन्नर २ हजार १५५, बारामती ८ हजार ५७८, पुरदंर ३ हजार १४३ आणि दौंड १० हजार ६५३ तालुक्यात तसेच राष्ट्रीय व इतर बँकेमार्फत २ हजार ३९७ असे एकूण ५० हजार ४४८ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील ३ हजार १०७, पाटण १ हजार ८८६, महाबळेश्वर १९४ , जावळी ६९८, वाई ८४१, खंडाळा १ हजार ३७१, फलटण ४ हजार ४९३, माण ३ हजार ८०१, खटाव २ हजार ९५३, कोरेगांव ४ हजार १२४ आणि सातारा तालुक्यातील १ हजार ९५६ एकूण २५ हजार ४२४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील ७५, दक्षिण सोलापूर १२५, पंढरपूर ५५८, सांगोला २७६, माळशिरस ५९८, बार्शी १६७, करमाळा ४५७, मोहोळ ३४२, माढा ३४८, अक्कलकोट ९३ आणि मंगळवेढा ७३७ तसेच राष्ट्रीय व इतर बॅंकेमार्फत १५ हजार ९५५ एकूण १९ हजार ७३१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण कालअखेर पूर्ण झाले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जावून आपले आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. आधार प्रमाणीकरण करुन घेतल्यानंतरच शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात रक्कम जमा होणार आहे तसेच नवीन पीक कर्ज घेण्यासही शेतकरी पात्र होणार आहेत, त्यामुळे आपले आधार प्रमाणीकरण करुन करुन घ्यावे, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## आता २९ ऑगस्टपासून निर्णायक लढा : मनोज जरांगे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणासाठी २९ ऑगस्टपासून निर्णायक लढा देणार आहे. आता माघार नाही, भले राज्यातील सरकार राहिले काय अन गेले काय आम्हाला काही फरक पडत नाही. असा निर्धार मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी व्यक्त केला.

मराठा आरक्षण आंदोलनाविषयी वातावरण निर्माण करण्यासाठी जरांगे यांचा राज्यभर दौरा सुरू आहे. त्याअंतर्गत शनिवारी सोलापूर, वडाळा (उत्तर सोलापूर) आणि तुळजापूर दौऱ्यावर ते होते. यातिन्ही ठिकाणी विविध कार्यक्रमांत समाज बांधवांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

अंतरवली आंदोलनाने मुंबई जाम झाली की सरकारला कळ लागते. तोवर लागत नाही. आता मेलो तरी बेहत्तर पण माज्या समाज बांधवांवर अन्याय होवू देणार नाही, असा सज्जड इशारा जरांगे यांनी तुळजापुरातील सभेत दिला. तसेच सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सुशोभीकरण व ऐतिहासिक भित्तीशिल्पाचे उदघाटन जरांगे यांनी केले.

यानंतर सोलापुरात बोलताना जरांगे म्हणाले, आंदोलन चिरडण्यासाठी आपल्याला अटक करण्याचा किंवा आंदोलनादरम्यान दगडफेक घडवून आणण्याचा सरकारचा डाव आहे. धाराशिवच्या सीमेनंतर आपला पोलिस बंदोबस्त काढण्यात आल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला. २९ ऑगस्टला मोठ्या संख्येने एकत्र येऊन मराठा समाजाने आपली ताकद दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले. उत्तर सोलापुर तालुक्यातील वडाळयात जाहीर सभेत जरांगे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रात भाजपचे जेवढे आमदार, खासदार, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष आहेत, त्या सर्वांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी समजून सांगण्याचा सल्लाही त्यांनी दिला. मंत्र्यांनी केलेल्या चुका मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सुधाराव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत, जर आमच्या सगळ्या मागण्या सरकारने मान्य केल्या तर सरकारला आम्ही दुखावणार नसल्याचेही जरांगे यांनी स्पष्ट केले.




## संपादकीय

# प्रश्न राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेचा

देशात आंदोलन उभे करायचे असेल, तर पूर्वी राजकीय पक्षांची गरज भासत होती. आज एका हॅशटॅगने, एका यूट्यूब व्हिडीओने किंवा एका टेलिग्राम समूहाने ते काम सुरू केले आहे. 'नीट' परीक्षेत वाद, सोशल मीडियावर अचानक चर्चेत आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'सारख्या डिजिटल समूहांची वाढ, आरक्षणविरोधी ऑनलाईन मोहिमा आणि ई-२० इथेनॉल ब्लेंडिंगविरोधात प्रचार यांसारख्या घटनांनी भारतीय राजकारणासमोर राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेभोवती प्रश्न उभा केला आहे. या बदलाला केवळ सोशल मीडिया जबाबदार नाही, तर विचारधारा सोडून सत्तेसाठी होणाऱ्या आघाड्या, पक्षांतराची मालिका, घराणेशाही, निवडणुकीपुरता जनसंपर्क आणि तरुणांच्या प्रश्नावरील मौन हे राजकीय पक्षांचे वर्तन जबाबदार आहे. गेल्या दशकात भारतीय राजकारणाचा केंद्रबिंदू विधानसभापासून स्मार्ट फोनच्या स्क्रीनवर सरकला आहे. पक्षांचे जाहीरनामे वाचणाऱ्यांपेक्षा रिल्स पाहणार्यांची संख्या अधिक आहे. पक्षांच्या पत्रकार परिषदांपेक्षा सोशल मीडियावरील ट्रेंड जनमत घडवू लागले आहेत. ही केवळ तांत्रिक क्रांती नाही, तर राजकीय विश्वासार्हतेच्या संकटाची घंटा वाजते आहे. त्याविषयी राजकीय पक्षांनी गांभीर्याने घेतले नाही, तर उद्या जनाधारातून मिळालेली बहुमताची सत्ताही उलथवून टाकली गेली, तर आश्चर्य वाटायचे कारण नाही.जगातील अनेक लोकशाहींनी सोशल मीडियाच्या राजकीय प्रभावाची झळ अनुभवली आहे. अरब स्प्रिंगपासून ब्रिटनमधील ब्रेक्झिट जनमत, अमेरिकेची २०१६ ची राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक, ब्राझीलमधील बोल्सोनारो यांचा उदय आणि फिलिपीन्समध्ये डुटर्टे-मार्कोस यांच्या डिजिटल प्रचार यंत्रणेपर्यंत प्रत्येक ठिकाणी सोशल मीडिया हा केवळ संवादाचे माध्यम राहिलेला नाही. तो जनमत घडविणारा आणि राजकीय कथानकाला दिशा देणारा निर्णायक घटक ठरला आहे. भारतातही 'नीट', आरक्षण आणि ई-२० इथेनॉल ब्लेंडिंगसारख्या विषयांवर निर्माण होर्णाया डिजिटल मोहिमा ही त्याच जागतिक प्रवाहाची भारतीय आवृत्ती मानावी लागेल. प्रश्न सोशल मीडियाचा नाही, तर पारंपरिक राजकीय पक्षांनी जनतेचा विश्वास इतका गमावला आहे की, लोक आता पक्षांपेक्षा प्लॅटफॉर्मवर विश्वास ठेवू लागले आहेत. त्याची जबाबदारी आता देशातील सर्वच राजकीय पक्षांना घ्यावी लागेल. चुका सुधाराव्या लागतील. अन्यथा, लोकशाहीचा ढाचाच बदलू शकतो.'नीट' प्रकरणाने याचे निर्विवादपणे दर्शन घडविले. लाखो विद्यार्थी आणि पालक रस्त्यावर उतरण्यापूर्वी सोशल मीडियावर एकत्र आले. डिजिटल दबाव इतका प्रबळ ठरला की, सरकार, राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि सर्वोच्च न्यायालयातही तत्काळ भूमिका स्पष्ट करावी लागली. या आंदोलनात राजकीय पक्ष नंतर आले; परंतु जनमत त्यापूर्वीच तयार झाले होते. विरोधी पक्षांनी या जनमताचा आपल्या राजकारणासाठी फास्टफूडसारखा वापर करून घेतला; परंतु हेच गंडांतर बिगर भाजपशासित संस्थांवर आले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.ई-२० इथेनॉल ब्लेंडिंगचेही तसेच झाले. ऊस उत्पादक, पर्यावरण आणि ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या धोरणावर वैज्ञानिक चर्चेपेक्षा सोशल मीडियावरील भीतीचे संदेश अधिक वेगाने पसरले. यावरून मायलेज घटले हा विषय अधिक प्रभावी आणि वास्तवदर्शी ठरला. आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावरही चित्र वेगळे नाही. राजकीय पक्ष भूमिका घेण्याआधी सोशल मीडियावर हजारो पोस्ट, व्हिडीओ आणि मोहिमा, मतमतांतरे घडवू लागले आहेत. त्यात तथ्य कमी आणि भावना अधिक असतात; पण राजकारणात अनेक वेळेला भावना तथ्यावर मात करतात, हा अनुभव लक्षात घेतला, तर राजकीय पक्षांना आता भानावर यावे लागेल. जनतेला आता पक्षांचे आश्वासन नको, तर तत्काळ उत्तर हवे आहे.खरा सर्वात मोठा धोका याच ठिकाणी आहे. कारण, सोशल मीडिया सरकार चालवत नाही. तो केवळ वातावरण तयार करतो. अल्गोरिदम जनमत निर्माण करू शकतात. ट्रेंड कायदे करत नाहीत. लोकशाहीचे निर्णय अजूनही संसद, विधिमंडळे आणि न्यायालयेच घेतात. यामुळे भारतात खरी स्पर्धा राजकीय पक्षांमध्ये नाही, तर ती विश्वासार्हतेची आहे. जो पक्ष पारदर्शकता, तथ्याधारित संवाद आणि डिजिटल उत्तरदायित्त्व स्वीकारेल, तोच टिकेल. अन्यथा राजकीय पक्षांची जागा कोणी घेतली नाही, तरी जनमतावर त्याचे वर्चस्व निश्चितच संपेल. लोकशाहीत हॅशटॅग सरकार चालवू शकत नाही; पण सरकारला अस्वस्थ नक्कीच करू शकतो आणि जेव्हा जनतेच्या विश्वासाचा लंबक पक्षाकडून सोशल मीडियाकडे सरकू लागतो, तेव्हा तो केवळ डिजिटल बदल नसतो, तर लोकशाहीच्या बदलत्या स्वरूपाचा गंभीर इशारा असतो.

# लोकमान्यांचा कर्मयोग ! गृहमंत्र्यांचा हास्ययोग !


**लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' तून कर्मयोग सांगितला. तेव्हा त्यांच्यासमोर पारतंत्र्य लादणारी ब्रिटिश सत्ता होती. अमित शहा तरुणांना 'गीतारहस्य' वाचनाचा उपदेश करताना त्यांच्यापुढे कोण आहे ? लोकसभेत - राज्यसभेत विरोधकांकडून मोदी-शहा यांच्या उपस्थितीची मागणी व्हावी, हा कोणता कर्मयोग ?**

अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिरातील दान-देणगी "दरोडा" आणि दिल्लीतील "जंतरमंतर"वरील आंदोलनकारी विद्यार्थ्यांवर झालेला पोलिसांचा अमानुष लाठीमार आणि अश्रुधूर, पॅलेट गनचा मारा याविषयीची माहिती देण्यासाठी "मोदी- शहा हाजीर हो"चा गजर विरोधक लोकसभेत-राज्यसभेत करीत आहेत. तिथे जाण्याऐवजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे १ ऑगस्ट रोजी नियोजित कार्यक्रमानुसार पुण्यात आले. दरवर्षी या तारखेला "टिळक परिवार प्रतिष्ठान"तर्फे "लोकमान्य टिळक पुरस्कार" प्रदान करून स्मृतिदिन साजरा केला जातो. यंदाचा पुरस्कार "राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार" अजित डोवाल यांना अमित शहा यांच्या हस्ते देण्यात आला. दोघेही नगास नग ठरावेत, अशी वादग्रस्त व्यक्तिमत्त्वं. यावेळी केलेल्या भाषणात अमित शहा म्हणाले, "मला लोकमान्य टिळकांचा "गीतारहस्य" हा ग्रंथ गुजरातीत वाचायला मिळाला. माझं तरुणांना आवाहन आहे की, तुम्ही टिळकांचा ग्रंथ वाचा, आयुष्यात तुम्ही कधीच चूक करणार नाही. हा ग्रंथ "भगवद्गीता"चे व्यावहारिक स्वरूप आहे. सामान्य माणूस 'भगवद्गीता' कशी जगू शकतो, हे त्यात सांगितलं आहे !"

अमित शहा गुजरातचे गृहमंत्री असताना, त्यांना २०१० मध्ये सोहराबुद्दीन शेख आणि कौसरबी यांच्या बनावट चकमक प्रकरणात कारावासाची आणि राज्याबाहेर तडीपार ही शिक्षा झाली होती. याच प्रकरणाचा खटला ज्यांच्यापुढे होता, त्या न्यायमूर्ती ब्रिजगोपाल हरकिशन लोया यांचा १ डिसेंबर २०१४ रोजी ते नागपूरला लग्नाला आले असताना, संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला. सोहराबुद्दीन शेख आणि कौसरबी बनावट चकमक प्रकरणात अमित शहा यांची "विशेष सीबीआय न्यायालय"ने पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली; तर जज लोया यांचा मृत्यू नैसर्गिक असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने चौकशीची मागणी फेटाळून लावणारा निकाल १९ एप्रिल २०१८ रोजी दिला. अमित शहा यांना दिलासा देणारे हे दोन्ही निकाल देशात "मोदी सरकार"ची सत्ता आल्यावर लागले आहेत. विषय निकालांचा नाही. विषय, अमित शहा यांनी "गीतारहस्य" ह्या प्रकरणांच्या आधी वाचले ? प्रकरणांचा ठपका लागल्यावर वाचले ? की, प्रकरणातून सुटका झाल्यावर वाचले ? हा आहे. कारण "भगवद्गीता"चे रहस्य चुका करू नयेत, त्या कशा टाळाव्यात; ह्याच्या मार्गदर्शनात नाही. तर, कर्तव्यबुद्धीने केलेल्या चुका ह्या योग्य व आवश्यक कशा असतात; ह्या तत्त्वज्ञानात आहे. कसे ? ते आधी "भगवद्गीता" आणि नंतर "गीतारहस्य" या ग्रंथांच्या परिचयातून घेऊ.

भगवान श्रीकृष्ण हे विष्णूचे अवतार ! 'विष्णू पुराणा'तील पाचव्या अंशात (भाग) श्रीकृष्णाच्या लीलांचे वर्णन आहे. पण त्यात "महाभारत" नाही. तसेच, "महाभारत"मध्ये "श्रीमद्भभगवद्गीता" नाही. "विष्णू पुराण" आणि "महाभारत" या दोन्ही ग्रंथांचे रचनाकार महर्षी वेद व्यास हेच आहेत. "महाभारत"मधील निर्णायक युद्ध सुरू असताना ते थांबवून श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेश केला आणि तो उपदेश महर्षी व्यासांनी भर रणांगणात मांडी ठोकून लिहून घेतला; असे घडू शकत नाही. "महाभारत" प्रमाणेच "श्रीमद्भभगवद्गीता" हादेखील स्वतंत्र ग्रंथ आहे. त्याचे रचनाकार आद्य शंकराचार्य आहेत. त्यांचा जीवनकाळ २,५०० वर्षांपूर्वीचा आहे. (जन्म : इसवी सनपूर्व ५०८ कालडी, केरळ; मृत्यू : इ.स.पू. ४७६ केदारनाथ, उत्तराखंड) म्हणजे, हा कालखंड मानवी जीवनाला धरून आहे. आद्य शंकराचार्यांच्या "गीताभाष्य" ग्रंथातून "भगवद्गीता" घेतली, असा इतिहास आहे. ७०० श्लोकांच्या "श्रीमद्भगवद्गीता"मध्ये १८ अध्याय आहेत. यातील पहिला अध्याय "अर्जुनविषादयोग" (युद्धभूमीवर अर्जुनाचा मोह आणि विषाद), दुसरा अध्याय






"सांख्ययोग" (आत्मा आणि शरीराचे ज्ञान; अर्थात,गीतासार) आणि तिसरा अध्याय "कर्मयोग" (कर्तव्य आणि कमार्चे महत्त्व) हे प्रमुख विषय आहेत.

"महाभारत"मधील युद्धात पांडव- कौरव आमने- सामने उभे ठाकले. निकराच्या क्षणी कौरव सेनापती कर्ण व अर्जुन समोरासमोर आले. त्यावेळी रथाचे चाक अचानक रुतल्याने कर्ण ते काढण्यात गुंतला. हीच वेळ त्याला मारण्याची आहे, "शरसंधान कर" असा सल्ला सारथी झालेल्या कृष्णाने अर्जुनाला दिला. त्याने अर्जुन गांगरला. गळपटला. त्याला तो अधर्म वाटला. "आपलेच काका, मामा, भाऊबंद मारून आपण कोणता धर्म जागवणार आहोत," असा प्रश्न त्याला सतावू लागला. तेव्हा श्रीकृष्णाने अनीती, अन्याय संपवून समाजाला सन्मार्गावर आणण्यासाठी, नातेसंबंध बाजूला ठेवून युद्ध करणे आवश्यक कसे आहे ते अर्जुनाला सांगितले आणि "तस्मात युद्धस्य भारत" हा उपदेश केला. त्याप्रमाणे अर्जुन वागला. त्याला अधिक हिंमत देण्यासाठी "श्रीमद्भगवद्गीता" अध्याय २, श्लोक ३७ मध्ये भगवंत श्रीकृष्ण म्हणतात -

"तस्मात उत्तिष्ठ कौन्तेय
युद्धाय कृतनिश्चयः।
यावत धर्मस्ततो जयः यतो
धर्मस्ततो जयः ॥"

अर्थात, "हे अजुर्ना, सज्ज हो आणि युद्ध करण्याचा दृढ निश्चय कर ! जिथे धर्म आहे, तिथे विजय होणार !"

अशाच प्रकारे अन्याय, अत्याचाराविरोधात समाजाला सज्ज करण्यासाठी आद्य शंकरार्चायांनी "गीताभाष्य"मधून "संन्यस्तधर्म" (अनासक्ती) सांगितला. संत ज्ञानेश्वरांनी "भावार्थदीपिका तथा ज्ञानेश्वरी"द्वारे मुसलमानी आक्रमकांपासून भाषा व संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी "भक्तियोग" सांगितला. लोकमान्य टिळकांनी पारतंत्र्याच्या बेड्या तोडण्यासाठी "गीतारहस्य"मधून "कर्मयोग" सांगितला. तर महात्मा गांधींनी देशाच्या स्वातंत्र्याचा लढा निर्णायक करण्यासाठी अहिंसेचा आग्रह धरणारा "सत्ययोग" (सत्याग्रह) सांगितला. "आद्य शंकराचार्यांप्रमाणेच संत ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी त्यांना जे सांगायचे होते, ते "भगवद्गीता"च्या आधारे सांगितले आहे," अशी सुरेख मांडणी अलीकडेच ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी केली आहे. यातून "भगवद्गीता"ला सर्वोच्च हिंदू धर्मग्रंथांचा मान का मिळाला आणि तिची लोकप्रियता का टिकून राहिली, ते अधोरेखित होते.

काळाच्या आणि समाजाच्या गरजेनुसार अर्थ काढता आला, म्हणून "भगवद्गीता"ची उपयुक्तताही टिकून राहिली. पण त्यातून धर्मांधता वाढावी, असा उद्देश कुणी बाळगला नव्हता. खुद्द "भगवद्गीता"मधून श्रीकृष्णाने जो धर्म सांगितला, त्याचा अर्थ "नैतिक कर्तव्य" असाच होतो. तसेच, कौरव - पांडव यांच्यातील युद्ध हे दोन धर्मातील नव्हते. दोघे एकाच कुळातील, सख्ख्ये चुलतभाऊ होते. कृष्ण पांडवांबरोबर होता आणि त्याचे यादव सैन्य कौरवांच्या दिमतीला होते. ह्या सर्वांचा धर्म एकच होता. म्हणूनच "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत" ह्या श्लोकाचा दाखला देत परधर्मीयांविरोधात हिंदूंना भडकवणे, त्यांना कट्टर करणे, हा अधर्म ठरतो. हेच आजचे "गीतारहस्य" आहे. देशात धर्मवाद आणि जातीवाद जोरात आहे. त्याचीच साक्ष अमित शहा यांचा आजवरचा राजकीय प्रवास देतो. तसे लोकमान्यांचे "गीतारहस्य" नाही.

जुलै १९०८ मध्ये मुजफ्फरपूर येथील बॉम्बस्फोटाच्या प्रकरणातील क्रांतिकारकांच्या बाजूने "दैनिक केसरी"त अग्रलेख प्रकाशित झाला. ह्या अग्रलेखाबद्दल "ब्रिटिश सरकार"ने लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात अडकवले आणि ६ वर्षांचा कारावास व १ हजार रुपये दंड; अशी शिक्षा सुनावली. ह्या कठोर शिक्षेसाठी त्यांना ब्रह्मदेशातील (आता म्यानमार) मंडाले कारागृहात ठेवण्यात आले. तिथले हवामान त्यांना मानवणारे नव्हते. त्यावर मात करण्यासाठी त्यांनी आपला अधिकाधिक वेळ वाचन, चिंतन आणि लेखनात घालवण्याचे निश्चित केले. 'गीतारहस्य'साठी भरपूर वाचन केले आणि टिपणे लिहून काढली. ६ वर्षांचा कारावास पूर्ण केल्यावर ते पुण्यात परतले आणि "गीतारहस्य"चे लेखन पूर्ण केले. १९१५ मध्ये प्रकाशित झालेल्या ह्या ग्रंथाचे पूर्ण नाव "श्रीमद्भगवद्गीतारहस्य" असे आहे. सोबत दुसरे नाव "कर्मयोगशास्त्र" असेही आहे. थोडक्यात, 'गीते'तील १८ पैकी तिसरा अध्याय "कर्मयोग"पुरताच "गीतारहस्य" मर्यादित आहे. 'गीते'चा मुख्य संदेश संन्यास किंवा कर्मत्याग नसून, फलाची अपेक्षा न करता आपले कर्तव्य करत राहणे (निष्काम कर्मयोग) हा आहे, हे लोकमान्यांनी वेदान्तशास्त्राच्या आधारे "गीतारहस्य"मध्ये पटवून दिले आहे. निष्काम कर्मयोग, धर्म आणि आचारधर्म यांचा समन्वय; आणि ज्ञान किंवा भक्तीपेक्षा कृती (कर्तव्य) श्रेष्ठ कशी ते "गीतारहस्य" आग्रहाने सांगते. गीतेमधील श्लोकांचा अर्थ लावण्यासाठी आणि पूर्वपक्ष व उत्तरपक्ष स्पष्ट करण्यासाठी लोकमान्यांनी प्राचीन 'मीमांसा' नियमांचा पद्धतशीर आधार घेतलाय. विवेचनासाठी 'उपनिषदे', 'ब्रह्मसूत्रे', 'महाभारत', 'वेद' आणि 'ऋग्वेद' इत्यादी ग्रंथांचे शेकडो दाखले दिले आहेत.

१५ प्रकरणांचा हा ग्रंथ दोन भागात आहे. ह्यातील पहिल्या "शास्त्रविवेचन" भागात गीतेतील श्लोकांचा अर्थ लावताना पूर्वमीमांसा, वेद आणि उपनिषदांचा आधार घेतलाय. यात "कर्मयोग" कसा श्रेष्ठ आहे, ते पटवून दिलंय. दुसऱ्या भागात "तुलनात्मक व व्यावहारिक मांडणी" आहे. यात 'गीता' आणि इतर पाश्चात्त्य व प्राच्य तत्त्वज्ञानांची तुलना केलीय. मोक्षप्राप्तीसाठी संन्यास न घेता कर्तव्याचे पालन कसे करावे, हे समजावून सांगितले आहे. हा सारा युक्तिवाद त्यांनी स्वातंत्र्याशी जोडल्याने "गीतारहस्य" हा स्वातंत्र्यलढ्यास वैचारिक प्रेरणा देणारा ग्रंथ ठरला. त्यातून क्रांतिकारकांना व देशप्रेमींना कर्तव्यकठोर राहण्याची आणि निःस्वार्थपणे देशाची सेवा करण्याची प्रेरणा मिळाली. ती आवश्यक होती.

कारण स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी लढताना भारतीयांची स्थिती 'महाभारता'तील युद्धात गळपटलेल्या अजुर्नासारखीच होत होती. स्वयंभू उच्चवर्णीय शिक्षणाच्या जोरावर ब्रिटिश सरकारच्या सेवेत छोटे- मोठे हुद्देदार झाले होते. ब्रिटिश लष्करात "नेटिव्ह" म्हणून भारतीय दाखल झाले होते. तसेच, क्रांतिवीरांना पकडून देणारे पोलीस अधिकारीही भारतीय होते. राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्यांना मंडालेच्या कारावासात धाडणारे न्यायाधीश दिनशॉ दावर हेदेखील भारतीयच होते. त्यांचा वा त्यांच्यापासून मिळणाऱ्या लाभाचा विचार न करता, स्वातंत्र्यासाठी सत्तेच्या विरोधात निःस्वार्थीपणे, कर्तव्य बजावण्यासाठी सज्ज व्हा, हे लोकमान्यांनी "गीतारहस्य"मधून सांगितले आहे. "जेव्हा माणूस पूर्णपणे निःस्वार्थ बुद्धीने निर्णय घेत असतो, तेव्हा तो अचूकच असतो !" हे लोकमान्य टिळकांचे म्हणणे, आजच्या तरुणांसाठी कसे उपयुक्त ठरणार ? सत्तेच्या नाना प्रकारच्या यंत्रणा वापरून "मोदी- शहा सरकार"ने राजकीय विरोधकांचा शक्तिपात केला. लोकशाहीचे सगळे स्तंभ आपल्या प्रभावाखाली आणले. जनतेला वेगवेगळ्या प्रश्नात गुंतवून दिशाहीन केले. लोकशाही हक्कांचा आग्रह धरणाऱ्यांवर भुंकण्यासाठी अंधभक्तांची फौज तयार केली. यातून परीक्षा पेपरफुटी विरोधात देशभरातील विद्यार्थी आंदोलकाच्या भूमिकेत उभे राहिले, तर त्यांच्याशी पोलिसांनी अमानुष व्यवहार केला. ह्या तरुणाईने "गीतारहस्य" वाचले असते, तर उपदेश करण्यासाठी गृहमंत्र्यांचं तोंड जागेवर राहिले असते का ? ह्याचा विचार न करता अमित शहा यांनी उपदेश केला. हा "हास्ययोग" आहे.



**ज्ञानेश महाराव**
ज्येष्ठ पत्रकार - संपादक

# भाडेकरू कार्यकर्ते यांचा न्यायालयात मोठा विजय

## भिडे यांचा जागेचा ताबा व नुकसान भरपाईचा दावा सखर्च फेटाळला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील चतुर्थ सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयाने भिडे यांनी भाडेकरू कार्यकर्ते यांच्याविरोधात दाखल केलेला जागेचा ताबा मिळविण्याचा नियमित दिवाणी दावा सखर्च फेटाळून लावला. वादीने केलेले जागेची गरज, इमारत धोकादायक असल्यासह अन्य दावे पुराव्यांच्या आधारे सिद्ध झाले नसल्याचे न्यायालयाच्या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

या निकालामुळे भाडेकरू कार्यकर्ते यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २०१२ मध्ये दाखल केला होता दावा भिडे यांनी ऑगस्ट २०१२ मध्ये कार्यकर्ते यांच्याविरोधात सदर दावा दाखल केला होता.

सी-ब्लॉकमधील गाळा क्रमांक सी-६ तसेच बी-ब्लॉकमधील खोल्यांची इमारत जुनी व धोकादायक झाल्याचे वादीचे म्हणणे होते. सोलापूर महापालिकेने इमारत पाडण्याची नोटीस दिल्याचा दावा करीत नवीन बांधकामासाठी जागेचा ताबा आवश्यक असल्याचे वादीने न्यायालयात नमूद केले होते. तसेच प्रतिवादीने जागेवर पक्के बांधकाम केल्याचाही आरोप करण्यात आला होता.

### भाडेकरूंच्या बाजूने पुराव्यांचा युक्तिवाद

प्रतिवादी कार्यकर्ते यांच्या वतीने ॲड. श्रीनिवास कटकूर व ॲड. आकाश आयंची यांनी बाजू मांडली. इमारतीमध्ये कोणतेही बेकायदेशीर अथवा पक्के बांधकाम करण्यात आलेले नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच वादीने जागेची वास्तविक व प्रामाणिक गरज (Bonafide Requiremenft) पुराव्यांद्वारे सिद्ध केलेली नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

महापालिकेने इमारत धोकादायक ठरविल्यानंतर प्रत्यक्ष पाडकामाची कारवाई केलेली नसल्याचे तसेच इमारतीबाबत खात्रीशीर स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल न्यायालयात सादर करण्यात आलेला नसल्याचेही प्रतिवादींच्या वतीने सांगण्यात आले.

कार्यकर्ते हे नियमितपणे दरमहा १ हजार ६७० रुपये भाडे भरत असून, त्यांच्याकडे वास्तव्यासाठी अन्य पर्यायी जागा उपलब्ध नसल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. ताबा दिल्यास भाडेकरूंचे भरून न येणारे नुकसान

उपलब्ध पुरावे व दोन्ही बाजूंचे युक्तिवाद विचारात घेत न्यायालयाने प्रतिवादींची बाजू ग्राह्य धरली.

जागेचा ताबा वादीला दिल्यास प्रतिवादींचे भरून न येणारे नुकसान होऊ शकते, अशी बाबही न्यायालयाने विचारात घेतली.

अखेर न्यायालयाने भिडे यांचा जागेचा ताबा तसेच नुकसानभरपाई संदभार्तील दावा सखर्च फेटाळून लावला (Dismissed with costs). त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या न्यायालयीन लढाईत भाडेकरू कार्यकर्ते यांना दिलासा मिळाला आहे.

# पाच वर्षे मृत्यूशी झुंज देणाऱ्या स्व. सौ. रुपाली (काकी) अनिल जगताप यांची हृदयस्पर्शी जीवनगाथा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** "एका घरातील स्त्री निघून जाते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू होत नाही; तर त्या घरातील प्रेम, माया, आपुलकी, आधार आणि जगण्याचा एक मोठा आधारच हरपतो." या भावनेचा प्रत्यय टेंभुर्णी येथील जगताप कुटुंबाला आला आहे. गेल्या पाच वर्षांपासून दोन्ही किडन्या निकामी झाल्यानंतरही जिद्दीने मृत्यूशी सामना करणाऱ्या स्व. सौ. रुपाली (काकी) अनिल जगताप यांचे शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजून ८ मिनिटांनी सांगली येथील उषःकाल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने केवळ जगताप कुटुंबावरच नव्हे, तर त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकाच्या मनावर शोककळा पसरली आहे.

रुपाली (काकी) यांना सुमारे पाच वर्षांपूर्वी दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे निदान झाले होते. हा आजार गंभीर असला तरी त्यांनी कधीही जगण्याची उमेद सोडली नाही. पती अनिल जगताप यांनीही प्रत्येक संकटात त्यांची खंबीर साथ दिली. नियमित उपचार, औषधे, डायलिसिस आणि वैद्यकीय सल्ला यामुळे त्यांनी अनेक कठीण प्रसंगांवर मात केली. या संपूर्ण काळात सांगली येथील उषःकाल हॉस्पिटलचे डॉ. मुंजाप्पा यांनी अत्यंत जिव्हाळ्याने आणि समर्पित भावनेने उपचार केले. कुटुंबीयांच्या मते, त्यांच्या प्रयत्नांमुळे रुपाली (काकी) यांचे आयुष्य अनेक वर्षे वाढले. त्यामुळे




आजही जगताप कुटुंब डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त करत आहे.

मात्र दि. २४ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री अचानक त्यांना फिटसदृश झटका आला आणि प्रकृती झपाट्याने खालावली. तातडीने त्यांना टेंभुर्णी येथील मार्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे डॉ. राहूल पाटील, डॉ. प्रसाद मोरे, डॉ. आमोल माने आणि मदत कांबळे यांनी त्वरित उपचार करून सिटीस्कॅन केले. या तपासणीत मेंदूमध्ये पाणी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील उपचारांसाठी त्यांना सांगली येथील उषःकाल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

उषःकाल हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या टीमने अत्याधुनिक वैद्यकीय उपचार सुरू केले. सागर भाऊ खोत यांनी तातडीने रक्तदाते यांना बोलावून 16 जनांचे रक्त दान केले मात्र दीर्घकाळ चाललेल्या किडनीच्या आजारामुळे शरीरातील इतर अवयवांवरही परिणाम झाला. किडन्यांनी पूर्णपणे काम करणे बंद केले आणि त्याचा परिणाम हृदयावरही झाला. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. क्रिएटिनिनची पातळी ३.०४ वरून ९ पर्यंत वाढल्याने प्रकृती अत्यंत चिंताजनक झाली. साध्या डायलिसिसऐवजी अत्याधुनिक पद्धतीने डायलिसिस करण्यात आले. त्यामुळे क्रिएटिनिनचे प्रमाण काहीसे कमी झाले, मात्र हृदयाची कार्यक्षमता सुधारली नाही.

शनिवारी दुपारी मेंदूतज्ज्ञ डॉ. संजीव कुलकर्णी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मेंदूवरील शस्त्रक्रिया करण्याच्या तयारीत होते. परंतु त्याआधीच रक्तदाब आणि हृदयाची गती अचानक कमी झाली. डॉक्टरांनी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण नियतीपुढे वैद्यकीय विज्ञानही हतबल ठरले आणि सायंकाळी ४ वाजून ८ मिनिटांनी रुपाली (काकी) यांनी अखेरचा श्वास घेतला.

रुपाली (काकी) यांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी, प्रेमळ आणि जिव्हाळ्याचा होता. कोणत्याही व्यक्तीला प्रेमाने आपलेसे करणे, घरातील प्रत्येकाला सांभाळून घेणे आणि संकटातही चेहऱ्यावर हसू ठेवणे, ही त्यांची ओळख होती. त्यामुळे त्या केवळ आपल्या कुटुंबातच नव्हे, तर नातेवाईक आणि मित्रपरिवारातही सर्वांच्या लाडक्या "काकी" म्हणून ओळखल्या जात होत्या. त्यांच्या पश्चात पती अनिल जगताप, दोन मुली आकांक्षा व अंकिता, मुलगा ओंकार, आई, थोरले बंधू महादेव जगताप, त्यांचा परिवार आणि मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे.

एका आईच्या जाण्याने मुलांच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार हरपतो. आईची माया, तिचा स्पर्श, तिचे प्रेम आणि तिचे मार्गदर्शन याची जागा कोणतीही व्यक्ती घेऊ शकत नाही. मुलांच्या प्रत्येक यशामागे आणि प्रत्येक अश्रूमागे आईच उभी असते. आज आकांक्षा, अंकिता आणि ओंकार यांच्या आयुष्यात ही मायेची सावली कायमची हरपली आहे. पत्नी ही नवऱ्याच्या आयुष्यातील केवळ जोडीदार नसते; ती त्याच्या प्रत्येक स्वप्नाची, प्रत्येक संघर्षाची आणि प्रत्येक यश-अपयशाची साक्षीदार असते. तब्बल २१ वर्षांचा संसार करताना रुपाली (काकी) यांनी प्रत्येक संकटात आपल्या पतीची खंबीर साथ दिली. त्यांच्या जाण्याने अनिल जगताप यांच्या आयुष्यात अशी पोकळी निर्माण झाली आहे, जी कोणत्याही गोष्टीने भरून निघणे अशक्य आहे. त्यांच्या आठवणी, त्यांचे प्रेम, त्यांचे त्याग आणि त्यांचा संघर्ष हेच आता या कुटुंबाची अमूल्य ठेव आहे.

स्व. सौ. रुपाली (काकी) अनिल जगताप यांचा संघर्ष, त्यांचे धैर्य, त्यांचा कुटुंबावरील जिव्हाळा आणि त्यांनी जपलेली माणुसकी कायम स्मरणात राहील. त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

ईश्वर स्व. सौ. रुपाली (काकी) अनिल जगताप यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि जगताप कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# जिल्हा परिषद शेवते शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत 16 विद्यार्थी पात्र

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद शेवते शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीचे 13 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत.

तर इयत्ता सातवीचे 3 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेले आहेत. माहे एप्रिल महिन्यात संपन्न झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथीचे विराज संतोष सोलनकर, तेजश्री सतीश बनकर, स्वरांजली राहुल तोंडले, सार्थक विठ्ठल धोत्रे, महालक्ष्मी अमित गिड्डे, शर्वरी चंद्रकांत पवार, तनुजा येताळ पवार, विराज समाधान मिसाळ, शिवन्या धनाजी कोळी, प्राची लखन सावंत, समृद्धी प्रकाश बोंबीडकर, अनन्या गणेश तोंडले, श्रावणी राहुल जाधव तसेच इयत्ता सातवीचे करण प्रदीप खळगे, स्नेहल संतोष तुपसौंदर, व पृथ्वीराज गणपत सुतार हे विद्यार्थी पात्र झाले आहेत. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक श्री शरद बिरादार तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक विलास नाईकनवरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी



बिभीषण रणदिवे, विस्तार अधिकारी दशरथ मोरे, शारदा रासकर, मुख्याध्यापक उज्वला शिंदे, शा.व्य. समिती अध्यक्ष सचिन धोत्रे, उपाध्यक्ष राजू तुपसौंदर व सर्व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती शेवते तसेच सर्व शिक्षकवृंद व समस्त ग्रामस्थ शेवते यांनी अभिनंदन केले आहे.

## वात्रटिका

### रिघ आणि रेटारेटी

त्यांच्या चौकटीत लईच
झाली आहे दाटीवाटी...
तरीही अजून चालू आहे
रिघ आणि रेटारेटी...
काल परवा कोणी भेटले
आज उद्या कोण भेटणार...
तोंडसुख घेतले एकमेकांवर
तेच एकमेकांना खेटणार...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विडी कामगारांना मिळणार 379 किमान वेतन

## कॉ. आडम मास्तर यांच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सोलापूरसह महाराष्ट्रातील विडी कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन मिळावे, वेतनातील फरकाची रक्कम अदा करावी, रोख मजुरी द्यावी आणि सरासरी १० हजार पेन्शन मिळावे, या मागण्यांसाठी उक्ळवच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या प्रदीर्घ संघषार्ला अखेर ऐतिहासिक यश मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने विडी कामगारांसाठी झोन–१ मध्ये प्रतिदिन ३७९ आणि झोन–२ मध्ये प्रतिदिन ३६१ किमान वेतन लागू असल्याचे स्पष्ट केले असून, त्याची अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ज्येष्ठ कामगार नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या नेतृत्वाखाली लाल बावटा विडी कामगार युनियनच्या माध्यमातून गेल्या जवळपास २९ वर्षापासून विडी कामगारांच्या किमान वेतनाच्या हक्कासाठी सातत्यपूर्ण संघर्ष सुरू आहे. या प्रदीर्घ लढ्याची शासनाने दखल घेतली असून, विडी कामगारांना शासनाने निश्चित केलेले किमान वेतन देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या ऐतिहासिक निर्णयाच्या पार्श्वभूमीवर शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी दत्तनगर येथील सिटूच्या मध्यवर्ती कार्यालयात हजारो विडी कामगारांच्या उपस्थितीत किमान वेतनाच्या लढ्याचा विजयोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. लाल गुलालाची उधळण, एकमेकांना लाडू भरवून आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला.

### २९ वर्षांच्या संघर्षाला यश

सोलापूर जिल्ह्यातील विडी उद्योगातील हजारो कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन मिळावे, त्यांच्या श्रमाला न्याय्य मोबदला मिळावा आणि श्रमकायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी लाल बावटा विडी कामगार युनियन गेली जवळपास तीन दशके संघर्ष करीत आहे.

युनियनच्या प्रदीर्घ संघर्षानंतर महाराष्ट्र शासनाने १४ नोव्हेंबर २०१४ रोजी विडी कामगारांसाठी किमान वेतन व विशेष भत्ता अधिसूचित केला होता. मात्र, या किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी अनेक वर्षे झाली नाही. उलट काही विडी कारखानदारांनी काही तथाकथित कामगार संघटनांना हाताशी धरून कामगारांच्या हिताविरुद्ध भूमिका घेत किमान वेतनाच्या अंमलबजावणीला अडथळे निर्माण केल्याचा आरोप युनियनने केला आहे.



विशेषतः १ एप्रिल २०१५ रोजी काही विडी उद्योगांमध्ये औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील कलम २(प) अंतर्गत तथाकथित तडजोडीचे करार करण्यात आले. या करारांमध्ये शासनाने अधिसूचित केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी मजुरी स्वीकारण्याच्या अटींचा समावेश करण्यात आला.

मात्र, किमान वेतन हा कामगाराचा वैधानिक हक्क असून, तो कोणत्याही तडजोडीने, कराराने किंवा दबावाखाली घेतलेल्या संमतीने हिरावून घेता येत नाही, अशी भूमिका सिटूने सातत्याने घेतली.

### कामगार मंत्र्यांच्या बैठकींमुळे निर्णय प्रक्रियेला वेग

किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी सिटू संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियनने शासन, प्रशासन आणि संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल घेत राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दि. ८ मे, २० मे आणि २ जून २०२६ रोजी कामगार संघटना, विडी उद्योगांचे प्रतिनिधी, कामगार आयुक्तालयातील अधिकारी आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठका घेतल्या.या बैठकींमध्ये शासनाने अधिसूचित केलेल्या किमान वेतनाच्या अंमलबजावणीबाबत सकारात्मक चर्चा झाली आणि आवश्यक निर्णय प्रक्रियेला गती मिळाली.

विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायामुळे कायदेशीर स्थिती स्पष्ट करण्यात आली असून

विडी कामगारांच्या प्रलंबित किमान वेतनाच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेतला. कक्ष अधिकारी प्रभाकर गवारे यांनी या संदर्भातील कार्यवाही केली.

विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार, दि. १० नोव्हेंबर २०१४ रोजीच्या अंतिम अधिसूचनेद्वारे निश्चित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर, वेतन संहिता, २०१९ मधील कलम ६९(२) अन्वये कायदेशीरदृष्ट्या वैध व अंमलबजावणीयोग्य राहतात.

ते विशेषतः बदलले किंवा अधिक्रमित केले जात नाहीत, तोपर्यंत नवीन संहितेअंतर्गत हेच दर लागू राहतील.

त्यानुसार, विशेष भत्त्यासह मूलभूत वेतनाचे एकत्रित दर झोन–१ साठी प्रतिदिन ३७९ आणि झोन–२ साठी प्रतिदिन ३६१ इतके असून, हेच विडी कामगारांना देय असलेले किमान वेतन असल्याचे स्पष्ट झाले आहे. या वेतनदरांची अंमलबजावणी करण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याचेही अभिप्रायात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे कामगार आयुक्त आणि इतर सक्षम प्राधिकरणांना संबंधित वेतनदरांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची तसेच ज्या ठिकाणी वेतनाची थकबाकी किंवा वेतनातील फरकाची रक्कम देय आहे, तेथे कायदेशीर प्रक्रियेनुसार ती वसूल करण्यासाठी कार्यवाही करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कमी मजुरी स्वीकारण्यासाठी दबाव टाकण्याचा आरोप

दरम्यान, अनेक विडी कारखानदारांकडून कामगारांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी युनियनकडे प्राप्त झाल्या आहेत. 'शासनाने निश्चित केलेले किमान वेतन आम्हाला मान्य नाही;

कारखानदार जेवढी मजुरी देतील तेवढीच स्वीकारावी,' असा दबाव काही ठिकाणी टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कमी मजुरी स्वीकारली नाही तर काम बंद करणे, रोजगार हिरावून घेणे, कच्चा माल न देणे किंवा इतर प्रकारे त्रास देण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही युनियनचे म्हणणे आहे.

काही ठिकाणी कामगारांकडून जबरदस्तीने सहमतीपत्रे घेण्याचे प्रयत्न होत असल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत.

किमान वेतनापेक्षा कमी मजुरी स्वीकारण्यास कामगारांना भाग पाडणे हा कामगारांच्या वैधानिक हक्कांवर घाला असून, अशा प्रकारचा दबाव कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका सिटूने घेतली आहे.

### रोख मजुरी आणि १० हजार पेन्शनची लढाई सुरूच राहणार

आज विडी कामगार महागाई, वाढता जीवनावश्यक खर्च, आरोग्याच्या समस्या आणि असुरक्षित रोजगारामुळे मोठ्या आर्थिक संकटातून जात आहेत. अशा परिस्थितीत शासनाने निश्चित केलेले किमान वेतन मिळणे हा त्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे.

किमान वेतनाच्या मागणीसोबतच रोख मजुरी आणि सरासरी १० हजार पेन्शन या मागण्यांसाठीही संघर्ष सुरू आहे. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी या मागण्यांबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला असून, या प्रश्नांवरही शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

'किमान वेतनाचा लढा जिंकला आहे; आता रोख मजुरी आणि १० हजार पेन्शनची लढाई लढायची आणि तीही जिंकायची,' असा निर्धार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केला.

### 'हा विजय कामगारांच्या एकजुटीचा!'

किमान वेतनाची मागणी घेऊन गेली जवळपास २९ वर्षे सातत्याने सुरू असलेल्या संघर्षाला मिळालेले हे यश म्हणजे केवळ एका मागणीचा विजय नसून, विडी कामगारांच्या संघटित शक्तीचा आणि लढाऊ एकजुटीचा विजय आहे, अशी भावना विजयोत्सवात व्यक्त करण्यात आली.

'लाल बावटा विडी कामगार युनियनच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळे विडी कामगारांना त्यांच्या हक्काचे किमान वेतन आणि वेतनातील फरक मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

हा संघर्ष इथे थांबणार नाही. रोख मजुरी आणि १० हजार पेन्शनसाठीची लढाईही यापुढे अधिक ताकदीने सुरू राहील,' असा विश्वास सिटूच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

यावेळी सिटू चे राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख मेजर,नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, सुनंदा बल्ला, दीपक निकंबे, ॲड अनिल वासम, दत्ता चव्हाण, शकुंतला पानिभाते, लिंगव्वा सोलापूरे, शेवंता देशमुख, सनी शेट्टी, अशोक बल्ला, बालकृष्ण मल्याळ, वीरेंद्र पद्मा मल्लेशम कारमपुरी, दत्त नगर येथील पूर्णवेळ कार्यकर्ते,

आदींसह शेकडो महिला विडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगळ मोहीम ते भविष्यातील रोबोट्स:

## ऑर्किड शाळेतील बालवैज्ञानिकांची अंतराळात उत्तुंग झेप !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. लक्ष्मण करळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उत्साहात पार पडले. यावेळी तुकाराम चंद्रकांत साळुंखे, क्रांतिवीर शिवराम महिंद्रकर, डॉ. अशोक सोरगावी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कुलच्या मार्गदर्शिका मिना पारखे उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी एआय च्या मदतीने आपल्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी अशा प्रदर्शनात सहभाग नोंदविला




पाहिजे असे म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. .कुमार दादा करजगी व संस्थेच्या सचिवा सौ.वर्षाताई विभुते यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन कल्पनेचे कौतुक केले.

या प्रदर्शनात शाळेतील तब्बल ४९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या बालवैज्ञानिकांनी अंतराळ मोहिमा, मंगळ ग्रह व चंद्र मोहीम, भविष्यातील रोबोटिक्स तंत्रज्ञान आणि स्वयंचलित उपकरणांचे एकापेक्षा एक सरस जिवंत मॉडेल्स सादर केले.

विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेने आणि आत्मविश्वासाने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थीनी कु..सान्वी चव्हाण व संज्ञा मोहिते यांनी केले.

प्रदर्शनाप्रसंगी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना 'विज्ञान केवळ पुस्तकात नसून ते आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे' याची अनुभूती मिळाली अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थित पालकवर्गानी दिली. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेल्या रोबोट्सच्या सादरीकरणाने या प्रदर्शनाची सांगता झाली.

# सनराईज क्लब च्या सामाजिक उपक्रमाचा इतरांनी आदर्श घ्यावा– मा.ना. राजन पाटील

## माजी आमदार यशवंत माने यांची उपस्थिती

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या यांच्या जयंतीनिमित्त सनराईज क्लबच्या वतीने घेण्यात आलेल्या मानवी शरीरातील महत्त्वाचा डोळा हा महत्त्वाचा अवयव आहे त्यासाठी डोळे तपासणी व उपचार आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे नवीन एनसीएमसी कार्ड काढणे शिबिर व प्रधानमंत्री आवास योजना शहरी हे ए.एच.पी घरकुल अर्ज भरणे सामाजिक उपक्रम राबवून सनराइज क्लबच्या माध्यमातून या क्लबचा आदर्श इतरांनी घ्यावा महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे मा.ना राजन पाटील.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि लोकनेते बाबुरांना पटले यांच्या जयंतीनिमित्त मोहोळ शहरात सोमवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी नगरसेवक मुस्ताक शेख उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सनराइज क्लबच्या वतीने नेत्र तपासणी व उपचार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे एनसीएमसी कार्ड काढण्याचे शिबिर घेण्यात आले. त्या कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद नागरिकांतून मिळाला. यावेळी प्रभागातील नागरिकांच्या





फक्त निवडणुका पुरतच नाही तर राजकारणाविरहित समाजकारण करणे आमचे नेते आदेशाने महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील माजी आमदार यशवंत तात्या माने यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही विविध सामाजिक उपक्रम राबवत आलो आहोत. त्यामध्ये डोळे तपासणी शिबिर, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिर, अन्नदान पाणीटंचाईच्या काळात पाणीवाटप असे सामाजिक उपक्रम राबवत आलो आहोत. करत असलेल्या कार्यक्रमांना नागरिकांतून चांगला प्रतिसाद मिळत आहे त्याबद्दल त्यांचेच मनःपूर्वक आभार. या पुढील काळातही असे सामाजिक उपक्रम करत राहू त्यामध्येही नागरिकांनी सहभाग घ्यावा ही विनंती. **मुस्ताक शेख,** मा. नगरसेवक

समस्या जाणून घेण्यासाठी नगरसेवक मुस्ताक शेख यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि लोकनेते बाबूराव अण्णा पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष मा.ना राजन पाटील तर कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार यशवंत माने उपस्थित. माजी जि प सदस्य शहाजहान शेख पोलीस निरीक्षक दीपक पाटील, होते.

यावेळी उपस्थित उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे नगरसेवक सतीश काळे बापू डोके, सुशील भैया क्षीरसागर, विक्रम फडतरे, संतोष सुरवसे, अझरुद्दीन कुरेशी, नगरसेविका शहनाज तलफदार, नगरसेविका शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख, राजू सुतार, वैभव गुंड, राजाराम वाघमारे, चंद्रकांत देवकते, डॉ. वसीम शेख, हेमंत गरड, उद्योजक खाजाभाई शेख डॉ. नसीर खान श्री बरे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाफिज सादिक इनामदार, समीर शेख, फरिद ईनामदार, आरिफ शेख, इरफान शेख, आसिफ शेख, रवी डोकडे, सागर स्वामी, मोहम्मद (बॉस) शेख, विजय लवटे, हुजेफ शेख, कयूम शेख, शोएब शेख, उमेश कांबळे, कैमोद्दीन शेख, फारुख बागवान, मुजम्मिल हुंडेकरी, शाहिद शेख, सुफियान शिकलकर, मोईन शेख, साकिब आतार, साकिब शेख, जुबेर शेख, आयान तांबोळी सनराईज क्लबचे आणि ए बी एस ग्रुपचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# रोटरी क्लब अकलूजचा पदग्रहण सोहळा संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** रोटरी क्लब अकलूजच्या रोटरी वर्ष २०२६–२७ चा पदग्रहण सोहळा दि.७ ऑगस्ट २०२६ रोजी स्मृतीभवन शंकरनगर– अकलूज येथे दिमाखात संपन्न झाला.

रोटरीचे मावळते अध्यक्ष रो.केतन बोरावके व सचिव रो. अजिंक्य जाधव यांनी प्रमुख अतिथी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे २०२७–२८ नियुक्त प्रांतपाल रो. क्षितिज झावरे व २०२६–२७ चे सहाय्यक प्रांतपाल रो. डॉ. साजिकराव पाटील यांच्या उपस्थितीत नूतन अध्यक्ष रो.डॉ. मनिष गायकवाड व सचिव रो. अभिषेक टेके यांच्याकडे पदभार सोपविला.यावेळी रो.क्षितिज झावरे यांची ओळख रोटरी डिस्ट्रिक्ट मेंबरशिप डायरेक्टर रो. सीए नितीन कुदळे यांनी केली तर प्रमुख अतिथी यांनी रोटरीचे सामाजिक कार्य,विविध सेवा प्रकल्प आणि समाजासाठी रोटरीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.नूतन अध्यक्ष रो.डॉ.मनिष गायकवाड यांनी आगामी वर्षातील विविध आरोग्य,शिक्षण, पर्यावरण व सामाजिक सेवा प्रकल्पांची रूपरेषा मांडत रोटरीचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त केला.यावेळी नूतन संचालक मंडळाची घोषणा करण्यात आली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले कवयित्री सौ. गुंजन पाटील यांचे खुमासदार कविता सादरीकरण.आपल्या विनोदी तसेच विचार करायला भाग पाडणाऱ्या कवितांनी त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमास विविध संस्था–संघटनांचे पदाधिकारी,पत्रकार बांधव व परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षपदी रो.डॉ.मनिष गायकवाड तर सचिव पदी रो. अभिषेक टेके तर कवियत्री गुंजन पाटील त्यांच्या खुमासदार सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.रोटरीचे कार्य आणि मनोरंजनाचा सुंदर संगम असलेल्या या आगळ्या वेगळ्या पदग्रहण सोहळ्याची परिसरात विशेष चर्चा झाली.


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 25

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 8 | | 1 | 7 | 5 | |
| | 7 | | 5 | 4 | 9 | | 1 | |
| | | 3 | 6 | | 2 | | 8 | |
| 2 | | | 3 | | 6 | | 4 | |
| | 6 | | 1 | 5 | | | | |
| | 3 | 5 | | 8 | 4 | 6 | | |
| | | 6 | 4 | 1 | | | | |
| | 5 | 8 | | | | 9 | 2 | |
| | | 7 | 9 | | | 1 | 6 | 5 |

# छत्रपती शिवाजी महाराज चौकाला ऐतिहासिक वैभवाची झळाळी

## भव्य भिंतीशिल्पाचे मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरात उभारण्यात आलेल्या आकर्षक व ऐतिहासिक भिंतीशिल्पाचे उद्घाटन आज मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती होती.



महानगर पालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या या भिंतीशिल्पामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसराला ऐतिहासिक तसेच आकर्षक स्वरूप प्राप्त झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचा पराक्रम, स्वराज्याची संकल्पना आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे भिंतीशिल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिक, शिवप्रेमी आणि पर्यटकांसाठी हे एक प्रेरणादायी स्थळ म्हणून विकसित होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर व नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचे स्मरण केले. शिवरायांच्या शौर्याची आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी शहरातील सार्वजनिक ठिकाणी अशा ऐतिहासिक स्वरूपाच्या उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम, मध्यवर्ती महामंडळाचे पद्माकर नाना काळे, दिलीप भाऊ कोल्हे, राजन जाधव, नगरसेवक विनोद भोसले, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, जयवंत सलगर, लता फुटणे, प्रकाश ननवरे, मतीन बागवान, नागेश वडणे, सचिन स्वामी, देविदास घुले, बसवराज कोळी, बजरंग जाधव यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, शिवप्रेमी नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भिंतीशिल्पामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सौंदर्यात भर पडली असून, सोलापूर शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाला नवी ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेल्या या शिल्पाच्या माध्यमातून इतिहास केवळ पाहता येणार नसून, त्यातून स्वराज्य, शौर्य आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणाही नागरिकांना मिळणार आहे.

# 500 शिक्षकांची भरती; शिक्षण क्षेत्राला मिळणार नवी बळकटी- चेतनसिंह केदार-सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ५०० शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे.

ही भरती प्रक्रिया 'पवित्र पोर्टल' च्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, सदर भरतीची जाहिरात दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर व्हावी आणि प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व्हावी, यासाठी ही शिक्षक भरती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

'शिक्षण हा विकासाचा पाया आहे. जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे ही आमची प्राथमिकता असून, शिक्षकांची उपलब्धता वाढवून ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे,' असे मत सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले.



**५०० शिक्षक भरतीचा महत्त्वपूर्ण निर्णय**

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ५०० शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू होत आहे. 'पवित्र पोर्टल' च्या माध्यमातून ही भरती पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी भरतीची जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शाळांना आवश्यक शिक्षक उपलब्धता आणि शिक्षण व्यवस्थेला अधिक बळकटी देणे, हा या भरतीमागील प्रमुख उद्देश आहे.

**— श्री. चेतनसिंह केदार-सावंत**
सभापती, शिक्षण व आरोग्य समिती जिल्हा परिषद, सोलापूर

या भरतीमुळे जिल्ह्यातील शाळांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळणार आहे.

पात्र उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेली जाहिरात वाचून आवश्यक पात्रता व अटींची पूर्तता करून भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

'शिक्षण मजबूत, तर सोलापूरचा भविष्यकाळ मजबूत!'

# मंत्री जयकुमार गोरे यांचा राजा माने यांच्या हस्ते सत्कार



**सातारा (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरची आषाढी यात्रा लाखो भाविकांच्या श्रद्धेचा आणि भक्तीचा सोहळा असताना, या यात्रेचे नियोजन सुरळीत, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यात आले. भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देतानाच यात्रा काळात सुरक्षितता आणि व्यवस्थापनाला प्राधान्य देण्यात आले. या यशस्वी नियोजनाबद्दल पंचायत राज व ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांचे अभिनंदन करत अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष राजा माने यांनी बोराटवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज माने यांच्या वतीने मंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार करण्यात आला.

पंढरपूर यात्रेदरम्यान राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पंढरपूरमध्ये दाखल झाले होते. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, भाविकांची सुरक्षितता, निवास, पाणी, आरोग्य तसेच इतर मूलभूत सुविधांचे योग्य नियोजन करणे हे मोठे आव्हान होते. मात्र, संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून यात्रा नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आल्याबद्दल यावेळी समाधान व्यक्त करण्यात आले.

मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी झालेल्या या सदिच्छा भेटीत राज्यातील विविध विकासकामे, ग्रामविकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाला मिळणारी गती तसेच डिजिटल माध्यम क्षेत्रातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा झाली. बदलत्या काळात डिजिटल पत्रकारिता अधिक प्रभावी होत असून, ग्रामीण आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यात डिजिटल माध्यमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, महासचिव विकास भोसले, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष धनंजय पाणसंडे, सचिव लिंगराज साखरे, सातारा जिल्हाध्यक्ष संतोष शिराळे तसेच डॉ. संतोष जोगदंड उपस्थित होते. मंत्री जयकुमार गोरे यांच्या निवासस्थानी झालेल्या या भेटीत संघटनेच्या आगामी उपक्रमांसह पत्रकार आणि डिजिटल मीडिया क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवरही विचारविनिमय झाला. भेटीमुळे संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संवादाला अधिक बळ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सयाजीराजे मोहिते- पाटील यांच्या संकल्पनेतून आरोग्य शिबीर संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या, मोफत आरोग्य शिबिरामध्ये ७६५ महिला व ५१० पुरूष अशा एकूण १२७५ रुग्णांनी लाभ घेतला असून, त्यामध्ये तालुक्यातील, लगतच्या तालुक्यातील रुग्णांनी लाभ घेतला आहे. अकलूजचे नगरसेवक युवानेते सयाजीराजे मोहिते- पाटील यांच्या संकल्पनेतून सदरच्या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज येथे आयोजित केलेल्या मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील, कार्यक्रमाचे आयोजक व अकलूज नगर परिषदेचे नगरसेवक युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील, सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ.एम.के. इनामदार, डॉ.सतीश दोशी, डॉ. अपर्णा सरवदे बार्शी, डॉ.हिना शेख बार्शी, डॉ. श्रीकृष्ण रत्नपारखी, डॉ.मानसी गांधी, डॉ. सुरेश सूर्यवंशी, डॉ.अमोल शिंदे, डॉ.सचिन सावंत, डॉ.सविता गुजर, डॉ. रेवती राणे, डॉ.अपूर्व गिरमे, डॉ.जोत्स्ना गायकवाड, डॉ. भूषण चंकेश्वरा, डॉ.विश्वास कदम, डॉ.रावसाहेब गुळवे, डॉ.साईराज भोंगळे,डॉ निनाद फडे, डॉ.समीर दोशी, डॉ.तुषार शेंडगे,डॉ.संजय वाळेकर, डॉ.नितीन कुबेर,

डॉ. अनिकेत काटकर, डॉ. आकाश देशमुख, डॉ.शकील पठाण,डॉ. माधुरी खताळ, डॉ.पाकीजा पठाण, डॉ.प्रिया कदम, डॉ.जागृती मगर, डॉ.मनिषा शिंदे, डॉ.अरुंधती खराडे-पाटील, डॉ. अभिजीत राजेभोसले, सहकार महर्षि कारखान्याचे कार्यकारी संचालक सुहास यादव, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव, हर्षवर्धन खराडे-पाटील, विविध संस्थांचे संचालक व इतर मान्यवर उपस्थित होते. सयाजीराजे मित्र मंडळ अकलूज, शंकरराव मोहिते- पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट, शंकरनर अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर-अकलूज, नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी, उपजिल्हा रुग्णालय अकलूज व प्राथमिक आरोग्य केंद्र, शंकरनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिबिरात कर्करोग, नेत्ररोग, अस्थिरोग, हृदयरोग व रक्त तपासण्या करण्यात आल्या. प्रस्ताविकात शिबिराचे आयोजक सयाजीराजे मोहिते पाटील म्हणाले,देशात ग्रामीण भागात कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे.महिलांमध्ये स्तनाचा व गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक आहे.दरवर्षी सुमारे तीन लाखांहून अधिक महिला या आजाराने बाधीत होतात.त्यांच्या मनातील भीती दूर व्हावी, आजाराचे निदान लवकर झाल्यास पुढील उपचार वेळेत मिळावेत.त्यांचा जीव वाचावा. कर्करोगासह महिलांच्या नेत्ररोग, अस्थिरोग, हृदयरोग व रक्ताच्या सर्व मोफत तपासण्या व्हाव्यात यासाठी या शिबिराचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.



डॉ.एम.के.इनामदार म्हणाले, रुग्णांच्या मनातील कर्करोगाची भीती घालवण्यासाठी व त्यांच्यावर मोफत उपचारासाठी अशा शिबिराची अत्यंत गरज आहे.या शिबिरातून एखाद्या रूग्णाचे प्राण वाचले तरी शिबिराचे यश आहे.डॉ.रेवती राणे म्हणाल्या,श्रीमती स्व. रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांचे सामाजिक कार्य मोठे होते. समाजातील महिला कौटुंबिक जबाबदारी पार पडताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात.या शिबिरामुळे महिलांची आर्थिक बचत होणार असल्याने शिबिराचे आयोजक सयाजीराजे मोहिते पाटील यांनी एक स्तुत्य उपक्रम राबवल्याचे त्यांनी सांगितले.

या आरोग्य शिबिरास मदनसिंह मोहिते-पाटील, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज सौ. सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील, दिपकराव खराडे-पाटील, प्रदीपराव खराडे-पाटील यांनी भेट दिली.

या तपासण्यानंतर रुग्णांना १५ दिवसांची मोफत औषधे शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्टच्या वतीने देण्यात आली तसेच भविष्यात ट्रस्टच्या वतीने गरजू रुग्णांना डोळ्यांची मोफत शस्त्रक्रिया (मोतीबिंदू) करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले,कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अभिजीत राजेभोसले यांनी आभार मानले.

# सव्वा कोटींच्या रस्ता मजबुतीकरणाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न; चौकशीची मागणी

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा शहरातील महात्मा फुले स्मारक ते शासकीय विश्रामगृह (सात विहीर) या मार्गावरील सुमारे १ कोटी २४ लाख रुपये खर्चाच्या रस्ता मजबुतीकरणाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज यांच्या अंतर्गत सुरू असलेल्या या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक व गुणवत्ता तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कामाच्या कार्यादेशातील अटींनुसार कामाच्या ठिकाणी गुणवत्ता तपासणीसाठी फील्ड लॅबची व्यवस्था अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी फील्ड लॅबची व्यवस्था करण्यात आली आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. तसेच रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या कॉंक्रीट, खडी व इतर बांधकाम साहित्याची नियमानुसार गुणवत्ता तपासणी होत आहे का, याचीही पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. रस्त्याच्या कामातील खडीकरण, रोलिंग व दाब देण्याच्या प्रक्रियेबाबतही काही नागरिकांनी आक्षेप नोंदवला आहे. तसेच कॉंक्रीटच्या मिश्रणाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, वापरण्यात येणाऱ्या साहित्याचे नमुने घेऊन नियमानुसार प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



कामाच्या ठिकाणी संबंधित अधिकारी नियमितपणे पाहणी करतात का, तसेच कार्यादेशातील तांत्रिक अटी व गुणवत्तेच्या निकषांचे पालन होत आहे का, याचीही तपासणी करण्याची मागणी होत आहे. प्रत्यक्ष काम करणाऱ्या एजन्सीच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असून, कार्यादेशातील अटींनुसारच काम सुरू आहे का, याची संबंधित विभागाने पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, रस्ता काम सुरू असताना वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सूचना फलक, दिशादर्शक व्यवस्था, रेडियम इंडिकेटर्स व इतर सुरक्षा उपाययोजना पुरेशा आहेत का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

महात्मा फुले स्मारक ते शासकीय विश्रामगृह हा मार्ग शहरातील महत्त्वाचा मार्ग असून, या परिसरातील शासकीय कार्यालये तसेच इतर ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांकडून या रस्त्याचा वापर केला जातो. त्यामुळे कामाचा दर्जा आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी करण्यात येत आहे.

या संपूर्ण कामाची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी. आवश्यक तांत्रिक चाचण्या करून कामाचा दर्जा निश्चित करण्यात यावा आणि तपासणीत काही त्रुटी आढळल्यास नियमानुसार आवश्यक कार्यवाही करून दर्जेदार काम करून घ्यावे, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन व स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे.

**बारा महिन्यांच्या मुदतीबाबतही प्रश्न......**

सदर रस्ता मजबुतीकरणाचे काम कार्यादेशाच्या तारखेपासून बारा महिन्यांत पूर्ण करण्याचे तसेच उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा यांच्या देखरेखीखाली काम करण्याचे निर्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, निर्धारित कालावधीबाबत तसेच काम सुरू होण्यास झालेल्या विलंबाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. काम सुरू झाल्यानंतरही ते अद्याप पूर्ण झाले नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

कामाच्या प्रगतीबरोबरच त्याची तांत्रिक गुणवत्ता आणि देखरेखीची प्रक्रिया यांची वरिष्ठ स्तरावरून पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी करून आवश्यक सुधारणा करण्यात आल्या नाहीत, तर सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येतील. त्यानंतरही दखल न घेतल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**— विशाल परदेशी,** तालुका अध्यक्ष
माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन, महाराष्ट्र राज्य

# दहिगांव येथील जैन मंदिरात घडलेल्या चोरीच्या घटने संदर्भात संस्कृती सातपुते यांची भेट

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** दहिगाव ता. माळशिरस येथील प्रसिद्ध दिगंबर जैन मंदिरात बुधवार दि.५ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते गुरुवारी सकाळी ६ वा.दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने मंदिरातून चांदीच्या मूर्ती, चरणपादुका, सोन्याचा मुलामा दिलेला कलश आणि ४० हजार रोख रक्कम असा एकूण ८ लाख ९१ हजारा पेक्षा जास्त रुपयांची चोरी झाली होती त्याबाबत नातेपुते पोलीस ठाणे येथे चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. मतदार संघात चोरी झाल्याची बातमी सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांना समजली असता. त्यांनी दहिगाव ता. माळशिरस येथील प्रसिद्ध दिगंबर जैन मंदिरात घडलेल्या चोरीच्या घटने संदर्भात भेट देऊन चोरी संदर्भात चौकशी करून तेथील पाहणी केली तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याशी संपर्क साधून सदर घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा तपास लवकरात लवकर करण्यात यावा या संदर्भात योग्य त्या सूचना सभापती संस्कृती सातपुते यांनी दिल्या. यावेळी बाहुबली चंकेश्वरा, शितल गांधी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.



चोरट्याने मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीलगत असलेल्या पाइपच्या साहाय्याने भिंतीवर चढून मंदिरात प्रवेश केला. त्यानंतर गाभाऱ्यातील कपाटाचे कुलूप तोडून पार्श्वनाथ स्वामी आणि अनंतनाथ यांच्या चांदीच्या मूर्ती, चांदीच्या चरणपादुका तसेच सोन्याचा मुलामा दिलेला लहान कलश चोरून नेला. याशिवाय मंदिरातील दोन दानपेट्या फोडून त्यातील सुमारे ४० हजार रुपयांची रोख रक्कमही लंपास करण्यात आली.

# नगराध्यक्षा डॉ. प्राणिता भालके यांनी भाजी मंडईतील विक्रेत्यांच्या समस्या जाणून घेतल्या

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरातील नवी पेठ भाजी मंडई परिसरात आज पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. सौ. प्राणिता भगीरथ भालके यांनी प्रत्यक्ष भेट देऊन भाजी विक्रेत्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विक्रेत्यांच्या अडचणी, दैनंदिन समस्या तसेच मंडई परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांची माहिती जाणून घेतली. पंढरपूर शहरातील भदुले चौक येथील भाजी मंडई परिसरात दररोज मोठ्या संख्येने नागरिक भाजीपाला खरेदी करण्यासाठी येत असतात.

त्यामुळे या परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज व्यवस्था, रस्ते, नाली व्यवस्था, पार्किंग, वाहतूक नियोजन तसेच विक्रेत्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांबाबत



नगराध्यक्षा डॉ. प्राणिताताई भालके यांनी विक्रेत्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी भाजी विक्रेत्यांनी आपल्या दैनंदिन अडचणी नगराध्यक्षांसमोर मांडल्या. भाजी विक्री करताना येणाऱ्या विविध समस्या, मंडईतील स्वच्छता व इतर नागरी सुविधांबाबत त्यांनी आपल्या सूचना दिल्या. नगराध्यक्षा डॉ. प्राणिताताई भालके यांनी विक्रेत्यांचे प्रश्न प्रत्यक्ष जागेवर जाऊन समजून घेत त्यांच्याशी संवाद साधला.

"भाजी विक्रेते हे शहराच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचा घटक आहेत. त्यांच्या व्यवसायाला सुविधा मिळाल्या पाहिजेत आणि नागरिकांनाही स्वच्छ, सुरक्षित व सुसज्ज मंडई परिसर मिळाला पाहिजे.

त्यामुळे विक्रेत्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या टप्प्याटप्प्याने सोडविण्यासाठी नगर परिषद प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल," असे नगराध्यक्षा डॉ. प्राणिताताई भगीरथ भालके यांनी यावेळी सांगितले.

मंडई परिसराची पाहणी करताना स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच परिसरातील नागरिक व व्यापारी यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, यासाठी आवश्यक नियोजन करण्याबाबतही त्यांनी चर्चा केली. नगराध्यक्षांनी स्वतः मंडई परिसरात येऊन भाजी विक्रेत्यांशी संवाद साधल्याने विक्रेत्यांनी समाधान व्यक्त केले.

पंढरपूर शहरातील सर्व घटकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे, या भूमिकेतून नगराध्यक्षा डॉ. प्राणिताताई भगीरथ भालके यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला.

# न्यासाकडून धार्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात भरीव काम- निलेश भोसले

**अक्कलकोट (प्रतिनिधी):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात भरीव काम न्यासाकडून होत आहे. मंडळाकडून अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमीची स्थापना करून ग्रामीण भागातील क्रिकेट पटूनां व्यासपीठ



निर्माण करून दिले आहे. मेट्रो शहराच्या धर्तीवर क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमी सुरु करण्यात आल्याचे मनोगत मुंबई क्रिकेट असोसिएशन चे सह सचिव निलेश भोसले यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांची सुंदर, सुबक, रेखीव धातूशिल्प प्रतिमा देण्यात आली. या प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी न्यासचे शुभम सावंत, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, संतोष माने, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# क्रांती दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** क्रांती दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना कामगार व समाजकल्याण कल्याण समितीच्या सभापती मा. सौ. श्रद्धा किरण पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मेकॅनिक चौक येथील तुळशीदास जाधव यांच्या



पुतळ्यास, सुपर मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास, आण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक) येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास तसेच आण्णाभाऊ साठे चौक येथील डॉ. कोटणीस यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. ९ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील 'भारत छोडो' आंदोलनाच्या स्मृती जागविणारा क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि जनजागृतीसाठी कार्य करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, विशाल माने, गुरुराज कानडे , किरण पवार व इतर कर्मचारी उपस्थित होते.